# आढावा बैठकीसाठी ऑनलाईन तक्रार स्वीकारणार

कोल्हापूर, ता. २० : उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत आणि राज्यमंत्री प्राजक्त तनपुरे सोमवारी (ता. २५) कोल्हापूर विभागीय सहसंचालक (उच्चशिक्षण) यांच्या अंतर्गत येणाऱ्या विविध शैक्षणिक घटकांच्या अडी-अडचणी सोडविण्याच्या दृष्टीने आढावा बैठक घेणार आहेत. बैठक शिवाजी विद्यापीठात सकाळी अकराला आहे.

ज्यांना समस्या मांडावयाच्या आहेत त्यांनी शुक्रवारी (ता. २२) सायंकाळी साडेपाचपर्यंत निवेदनपत्रे शिवाजी विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in या वेबसाईटच्या मुख्य पृष्ठावरील उच्च व तंत्रशिक्षण मंत्रालय @ कोल्हापूर या लिंकवर जाऊन सादर करावीत, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदिवडेकर यांनी केले आहे.

# तंत्रशिक्षणमंत्री सामंत यांची सोमवारी बैठक

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत आणि राज्यमंत्री प्राजक्ता तनपुरे हे सोमवारी (दि. २५) विविध शैक्षणिक घटकांच्या अडीअडचणी सोडवण्याच्या दृष्टीने आढावा बैठक घेणार आहेत. ही बैठक शिवाजी विद्यापीठात सकाळी ११ वाजता आयोजित करण्यात आली आहे. आढावा बैठकीच्या अनुषंगाने ज्या शिक्षक, पालक, विद्यार्थी, संस्थाचालक, शिक्षक संघटना, प्राचार्य संघटना, शिक्षकेतर कर्मचारी संघटना, विद्यार्थी संघटना आदी उच्च शिक्षण क्षेत्राशी संबंधित घटकांना सदर आढावा बैठकीमध्ये मंत्र्यांसमोर आपल्या समस्या मांडावयाच्या आहेत, त्यांनी शुक्रवारी सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत आपली निवेदनपत्रे शिवाजी विद्यापीठाच्या वेबसाईटच्या मुख्य पृष्ठावरील 'उच्च व तंत्रशिक्षण मंत्रालय' या लिंकवर जाऊन सादर करावीत, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी केले आहे.

# उच्च व तंत्र शिक्षण मंत्रालय आपल्या विभागात

- सोमवार २५ पासून कोल्हापुरातून प्रारंभ
- उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांची माहिती

प्रतिनिधी
कोल्हापूर

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील तेरा अकृषी विद्यापीठांचा दौरा केला. या दौऱ्यात विद्यार्थ्यांशिवाय पालक, शिक्षक, प्राचार्य, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यापीठीय कर्मचारी, शैक्षणिक संस्था, यांचे प्रश्न विविध स्तरावर प्रलंबित आहेत. याचा विचार करून 'उच्च व तंत्र शिक्षण मंत्रालय आपल्या विभागात' या अभिनव उपक्रमाची सुरुवात सोमवार २५ जानेवारीपासून शिवाजी विद्यापीठातून होत आहे, अशी माहिती उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत यांनी मुंबई येथे झालेल्या बैठकीत दिली.

मंत्री सामंत म्हणाले, उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या संदर्भात असलेल्या अडचणींसाठी संचालक, सहसंचालक, विद्यापीठ, मंत्रालय व इतर कार्यालयात यावे लागते. आपले प्रश्न सोडवण्यासाठी शिक्षक, कर्मचाऱ्यांचा प्रशासकीय कार्यालयाच्या फेऱ्यात वेळ, ऊर्जा व पैसा खर्च होतो. अनेक विभागांत जाऊन अडीअडचणी मांडत त्या सोडविण्यापेक्षा उच्च व तंत्र विभागातील मंत्रालय व संचालक स्तरावरील अधिकाऱ्यांसमवेत विभागीय ठिकाणी सर्व संबंधित घटकांची भेट घेऊन प्रश्नांची तत्काळ सोडवणूक करण्यात येईल. विद्यार्थी, पालक, शिक्षक, प्राचार्य, शिक्षकेत्तर कर्मचारी, शैक्षणिक संस्था यांच्या अडी–अडचणी सोडविण्यासाठी राज्यभर बैठका घेतल्या जाणार आहेत. याची सुरुवात कोल्हापूरातून होणार आहे. या बैठकीस येताना आवश्यक ती कागदपत्रे आणि आपल्या समस्यांचे निवेदन घेऊन यावे, असे आवाहन सामंत यांनी केले.

# ‘उच्च व तंत्रशिक्षण मंत्रालय आपल्या विभागात’ उपक्रम

## सोमवारपासून कोल्हापूरमधून होणार प्रारंभ

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

विद्यार्थ्यांशिवाय पालक, शिक्षक, प्राचार्य, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यापीठीय कर्मचारी, शैक्षणिक संस्था, यांचे प्रश्न विविध स्तरांवर प्रलंबित आहेत. या बाबींचा विचार करून ‘उच्च व तंत्रशिक्षण मंत्रालय आपल्या विभागात’ या अभिनव उपक्रमाची २५ जानेवारीपासून कोल्हापूरमधून सुरुवात करत असल्याची माहिती उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी दिली.

विद्यार्थी, पालक, शिक्षक, प्राचार्य, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यापीठीय कर्मचारी, शैक्षणिक संस्था यांच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी राज्यातील प्रत्येक विभागनिहाय बैठका घेतल्या जाणार आहेत. सुरुवात कोल्हापूर विभागापासून होत आहे. बैठकीस येताना आवश्यक ती कागदपत्रे आणि समस्यांचे निवेदन घेऊन यावे, असे आवाहनही मंत्री सामंत यांनी केले.

२५ जानेवारी २०२१ रोजी सकाळी ११ वाजता या उपक्रमाची सुरुवात कोल्हापूर येथील शिवाजी विद्यापीठ येथून होत आहे. प्रधान सचिव, आयुक्त राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, संचालक तंत्रशिक्षण संचालनालय, संचालक उच्चशिक्षण, संचालक कला संचालनालय, संचालक महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, संचालक ग्रंथालय संचालनालय, सहसंचालक, उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे सर्व उच्चपदस्थ अधिकारी व कर्मचारी या उपक्रमात सहभागी होणार आहेत.

# विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेची पुरस्कारात भरारी

कोल्हापूर

महाराष्ट्र शासनाकडून राष्ट्रीय सेवा योजना विभागामध्ये सर्वोत्कृष्ठ कार्य केल्या जाणाऱ्या महाविद्यालय, कार्यक्रम अधिकारी, स्वयंसेवक यांना तीन वर्षांमध्ये केलेल्या कार्याच्या आधारावर मूल्यमापन करून पुरस्कार दिले जातात. यावर्षी शिवाजी विद्यापीठास सर्वोत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी पुरस्कार (स्मृतिचिन्ह व ५००० रुपये) द्वितीय क्रमांक डॉ. धनंजय लोहार, श्रीमंत बाबासाहेब देशमुख कॉलेज, आटपाडी. सर्वोत्कृष्ट महाविद्यालय- (स्मृतिचिन्ह) द्वितीय क्रमांक श्रीमंत बाबासाहेब देशमुख कॉलेज, आटपाडी. सर्वोत्कृष्ट स्वयंसेवक पुरस्कार (स्मृतिचिन्ह व





२०००) तृतीय क्रमांक कु. ऐश्वर्या मोरे- विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर यांना पुरस्कार प्राप्त झाला आहे. याबद्दल कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील कुलसचिव डॉ, व्ही. डी. नांदवडेकर तसेच राष्ट्रीय सेवा योजना कक्षाचे संचालक अभय जायभाये यांनी अभिनंदन केले.

# मराठी कवितेतील कोल्हटकर ध्रुवतारा

## तज्ज्ञांचा सूर; मराठी विभागातर्फे 'स्मरण अरुण कोल्हटकरांचे' चर्चासत्र

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २० : मराठी कवितेच्या प्रांतामध्ये अरुण कोल्हटकर यांचे स्थान ध्रुवताऱ्याप्रमाणे आहे. त्यांच्या कवितेवर दुर्बोधतेचे आरोपण करण्याऐवजी ती समजून घेण्याचा, समजावून सांगण्याचा प्रयत्न करण्याची आज खरी गरज आहे, असा सूर 'स्मरण अरुण कोल्हटकरांचे' चर्चासत्रात उमटला.

शिवाजी विद्यापीठाचा मराठी अधिविभाग, राज्य साहित्य संस्कृती मंडळातर्फे मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याअंतर्गत चर्चासत्र झाले. प्रा. अविनाश सप्रे (सांगली), गणेश विसपुते (पुणे), प्रा. अरुण चव्हाण (सांगली), बाळासाहेब आळवेकर (कोल्हापूर) सहभागी झाले. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते.

प्रा. सप्रे म्हणाले, "कोल्हटकरांच्या कवितेमध्ये परंपरा आणि नवता यांचा परस्परसंबंध आढळतो. आधुनिक मराठी कवितेचे स्वरुप समजावून घेण्याच्या दृष्टीने कोल्हटकरांच्या कवितेचे महत्त्व कालातीत आहे."

श्री. विसपुते म्हणाले, "कोल्हटकरांच्या साहित्याविषयी मराठी साहित्यिक क्षेत्रातच खरे तर मोठी अनास्था आहे. मानवी



जगण्यातली विसंगती आणि भोवतालातली असंगती टिपण्याचे काम त्यांनी आपल्या कवितेच्या माध्यमातून केले आहे."

प्रा. चव्हाण म्हणाले, "कोल्हटकर लहानपणापासूनच मनस्वी, अंतर्मुख स्वभावाचे होते. जीवन आणि त्याचे महत्त्व समजून घेण्यासाठी हा माणूस महाराष्ट्रभर पायी फिरला. मुंबईच्या रस्त्यावरील कलाकाराचे कौतुक करण्यासाठी पैसे नव्हते, तर अंगावरील शर्ट त्याला भेट देऊन तसाच आनंदाने घरी जाणारा हा अवलिया होता."

श्री. आळवेकर म्हणाले, "कोल्हटकर हे साहित्य आणि समाज यांचा संगम साधणारे कृतिशील कवी होते. कोल्हापूर महापालिकेकडून त्यांच्या स्मरणार्थ सभागृह उभारण्यात येत आहे. ते कोल्हापुरातील सांस्कृतिक चळवळीचे केंद्र म्हणून पुढे यावे." कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, "मराठी अधिविभागाने भाषा संवर्धन पंधरवड्याच्या निमित्ताने अरुण कोल्हटकरांसह अनेक नव्या जुन्या प्रभावी साहित्यिक, कवींचा परिचय नव्या पिढीला घडवून आणला आहे. नव्या पिढीला प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वांशी, साहित्यिकांशी जोडण्याची ही प्रक्रिया निरंतर सुरू राहावी."

प्रा. श्रीकृष्ण कालगावकर उपस्थित राहू शकले नाहीत. सुश्मिता खुटाळे यांनी त्यांच्या लेखी टिपणाचे वाचन केले.

डॉ. रणधीर शिंदे यांनी स्वागत केले. डॉ. नंदकुमार मोरे यांनी परिचय करून दिला. इतिहास अधिविभाग प्रमुख डॉ. अवनिश पाटील, डॉ. प्रकाश पवार, डॉ. रघुनाथ कडाकणे, डॉ. नीलांबरी जगताप, उदय कुलकर्णी, विद्यार्थी उपस्थित होते.

# सर्वंकषज्ञानदानाचा कौतुकास्पद उपक्रम

## डॉ. शिर्के : बी.ए. भाग-च्या दोन पुस्तकांचे प्रकाशन

(२१।१।२)

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २० : 'अभ्यासक्रमाचे रूपांतर एका दर्जेदार क्रमिक पुस्तकात करण्याचे काम मराठी अभ्यास मंडळाने केले. विद्यार्थ्यांपर्यंत सर्वंकष ज्ञान पोहोचविण्याचा हा प्रयत्न कौतुकास्पद आहे. विषयाची गोडी निर्माण होण्याबरोबरच विद्यार्थ्यांत रोजगाराभिमुखता निर्माण करण्यासाठी अभ्यास मंडळाचा पुस्तकरुपी उपक्रम महत्त्वाचा आहे,' असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. त्यांच्या हस्ते 'भाषा व अर्थार्जनाच्या संधी' आणि 'दृष्टांतपाठः निवडक दृष्टांत' या बी.ए. भाग-च्या दोन क्रमिक पुस्तकांचे प्रकाशन झाले. या वेळी डॉ. शिर्के बोलत होते.

मराठी अधिविभाग आणि महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने साजऱ्या करण्यात येत असलेल्या मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याच्या निमित्ताने हा सोहळा झाला. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. पुस्तकाचे संपादक डॉ. दत्ता पाटील यांनी स्वागत व प्रास्ताविक केले.

डॉ. अरुण शिंदे, अधिविभाग प्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी पुस्तकांविषयी मनोगत व्यक्त केले. या वेळी घटक लेखक डॉ. अर्जुन चव्हाण, डॉ. ए. एम. गुरव, प्रा. नानासाहेब जामदार, डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. आलोक जत्राटकर, डॉ. कोमल कुंदप, योगीराज बच्चे यांचा ग्रंथभेट देऊन गौरव करण्यात आला.

# कालानुरूप मूल्यमापन पद्धती अंगीकारावी : कुलगुरू शिर्के

**कोल्हापूर :** कोरोनासारख्या आपत्ती मानवी इतिहासात येत-जात राहतील. यातून तयार होणाऱ्या परिस्थितीला सामोरे जात शैक्षणिक समुदायाने मूल्यमापन पद्धतीत सुसंगत बदल अंगीकारून समर्थपणे मार्गक्रमण करावे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांनी केले.

महावीर महाविद्यालय अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष व टीचर एज्युकेटर ग्रुपमार्फत आयोजित 'एक्झामिनेशन रिफॉर्मस् इन पोस्ट पॅडेमिक इंडिया' विषयावरील एकदिवसीय राष्ट्रीय वेबिनार उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. प्राचार्य डॉ. राजेंद्र लोखडे यांनी प्रास्ताविक केले. वेबिनारच्या निमंत्रक प्रा.डॉ. एम. एस. पद्मिनी यांनी विषयाची प्रस्तुतता सांगितली. याप्रसंगी अरुणाचल प्रदेशातील राजीव गांधी केंद्रीय विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. साकेत कुशवाहा, म्हैसूर विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. जी. हेमतकुमार यांनी मनोगत व्यक्त केले. वेबिनारचे संयोजन समन्वयक डॉ. सरला मेनन, आयक्यूएसी समन्वयक डॉ. संजय ओमासे यांनी केले. डॉ. कल्पना गंगातीरकर, प्रा. अजितकुमार चौगुले यांनी आभार मानले.

# घोडावत विद्यापीठाचा २३ रोजी पदवीदान समारंभ

**जयसिंगपूर : प्रतिनिधी**

येथील संजय घोडावत विद्यापीठाचा दुसरा पदवीदान समारंभ शनिवार, दि. २३ जानेवारी रोजी दु.२ वा. ऑनलाईन व ऑफलाईन पद्धतीने संपन्न होणार आहे. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के उपस्थित असणार आहेत, तर विद्यापीठाचे अध्यक्ष संजय घोडावत अध्यक्षपद भूषविणार आहेत.

प्रभारी कुलगुरू डॉ. एम. टी. तेलसंग म्हणाले, कोरोनामुळे सोशल डिन्स्टसिंग नियमाचे पालन करण्याकरिता सभारंभ ऑनलाईन व ऑफलाईन पद्धतीने होणार आहे. यामुळे ज्या विद्यार्थ्यांनी विभागनिहाय प्रथम क्रमांकाचे सुवर्णपदक पटकाविले आहे, त्यांना ऑफलाईन पद्धतीने पदवी प्रदान केली जाणार आहे. या कार्यक्रमास त्यांचे पालक उपस्थित असणार आहेत. इतर विद्यार्थ्यांना ऑनलाईन पदवी प्रदान केली जाणार आहे. या कार्यक्रमास विश्वस्त विनायक भोसले, सचिव श्रेणिक घोडावत यांचीही उपस्थिती असणार आहे.

# संजय घोडावत विद्यापीठाचा शनिवारी पदवीदान समारंभ

## कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते पदवी प्रदान

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

संजय घोडावत विद्यापीठाचा दुसरा पदवीदान समारंभ शनिवारी (दि.२३) दुपारी सव्वादोन वाजता ऑनलाईन व ऑफलाईन पद्धतीने घोडावत विद्यापीठात होणार आहे. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.डी. टी.शिर्के यांच्या हस्ते आणि घोडावत विद्यापीठाचे अध्यक्ष संजय घोडावत यांच्या अध्यक्षतेखाली पदवी प्रदान केली जाणार आहे.

विभागनिहाय प्रथम क्रमांकाने सुवर्णपदक पटकाविलेल्या विद्यार्थ्यांना ऑफलाईन पदवीप्रदान केली जाणार आहे. या कार्यक्रमास त्यांचे पालक देखील उपस्थित राहणार आहेत. उर्वरीत सर्व विद्यार्थ्यांना ऑनलाईन पदवीप्रदान केली जाणार आहे, अशी माहिती संजय





कुलगुरू शिर्के     संजय घोडावत

घोडावत विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. एम. टी. तेलसंग यांनी पत्रकाद्वारे दिली. कार्यक्रम आयोजनासाठी विश्वस्त विनायक भोसले, प्रभारी कुलगुरू डॉ.एम. टी. तेलसंग, कुलसचिव डॉ. एन.के.पाटील, संचालक डॉ.व्ही.व्ही. कुलकर्णी, परीक्षा नियंत्रक डॉ. श्रीनिवास बाळकुंडी यांनी परिश्रम घेतले आहेत. विद्यापीठाचे अध्यक्ष संजय घोडावत, सचिव श्रेणिक घोडावत यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.